Impact Factor – 6.261 | Special Issue - 160 | March 2019 | ISSN - 23

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

**Multidisciplinary International E-research Journal**

One Day Interdisciplinary National Conference On

# भारतातील सामाजिक व सांस्कृतिक समस्या

Organized by

Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

Sponsored by

**K.B.C. North Maharashtra University**

Jalgaon



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

For Details Visit To : www.researchjourney.net

Scanned with OKEN Scanner

ISSN : 2348-7143
March 2019

# : CONTENTS :

## मराठी


१. लोकसंख्या शिक्षण – काळाची गरज ........ १
प्रा.डॉ.वसंत श्रावण देसले

२. भारतातील शेतकरी आत्महत्या एक भौगोलिक अध्ययन : विशेष संदर्भ मराठवाडा ........ ३
डॉ.ए.आय. खान, आरगडे अंबादास रोहिदास

३. भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे आणि उपाय ........ १०
प्रा. डॉ. शंकर राजे

४. भारतातील जात व वर्णव्यवस्था ........ १२
डॉ. बी. आर. तनपुरे

५. खेळ की शिक्षण एक वर्णनात्मक अभ्यास ........ १४
डॉ. शिवानंद भरत पाटील

६. लोकसंख्या वाढ भारतीय समाजातील ज्वलंत प्रश्न ........ १६
प्रा. डॉ. मधुकर आत्माराम देसले

७. विद्यादेवी सावित्रीबाई रोडे– स्त्री प्रबोधन आणि शैक्षणिक योगदान ........ १९
प्रा.डॉ.खासेराव भैरव सिंदे पाटील

८. महिला खेळाडूंच्या समस्या ........ २१
प्रा. जानकी वामनराव कुर्तडीकर

९. अमरावती जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येचे समस्यात्मक दृष्टीकोनातून भौगोलिक अध्ययन ........ २३
प्रा. डॉ. जयश्री वाय. पडोळे, श्री. रामकृष्ण महादेवराव शिरस्कर

१०. मराठी कवितेतून व्यक्त होणारे सामाजिक व सांस्कृतिक समस्यांचे वर्णन ........ २६
प्रा. डॉ. निलेश एकनाथराव लोंढे

११. स्त्री भ्रूणहत्या : स्वरूप आणि उपाय योजना ........ २९
प्रा.गजानन आनंता देवकर

१२. जैन दर्शनांतून प्रतीत झालेला बहुसांस्कृतिक राष्ट्रवाद ........ ३३
प्रा.डॉ.संजय जिभाऊ पाटील

१३. भारतातील जात व वर्णव्यवस्था : एक समस्या ........ ३६
डॉ.रावसाहेब भिमराव नेरकर

१४. लोकसंख्या वाढीमुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास ........ ३८
प्रा.डॉ. सुनिल विक्रम कुवर

१५. शेतकऱ्यांची आत्महत्या : कारणे आणि उपाय योजना ........ ४१
प्रा. कांतीलाल दाजभाऊ सोनवणे

१६. दलित चळवळीच्या समस्येचे ऐतिहासिक परीप्रेक्ष ........ ४४
प्रा.डॉ. दिलीप तुकाराम कदम

१७. वाढती लोकसंख्या : एक ज्वलंत समस्या ........ ४७
प्रा.डॉ.बालाजी विठ्ठलराव पवार

१८. भारतीय समाजातील स्त्री–भ्रूण हत्या ........ ५०
प्रा.डॉ.मीना नामदेवराव काळे

१९. भारत आणि नक्षलवाद एक अंतर्गत युध्द ........ ५३
बांगर आकाश शेषराव




Scanned with OKEN Scanner

# भारतातील जात व वर्णव्यवस्था : एक समस्या

डॉ.रावसाहेब भिमराव नेरकर
इतिहास विभाग
राणी लक्ष्मीबाई महाविद्यालय, पारोळा, जि.जळगांव

Rani Laxmibai Mahavidyalaya IQAC PAROLA Dist.Jalgaon

**प्रस्तावना :**

भारतीय समाजव्यवस्थेला 'जातियता' हा एक मिळालेला शाप आहे. अखिल भारतात जातीयतेचे प्रखर स्वरुप जाणवते. प्राचीन काळात चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून जातिव्यवस्था निर्माण झाल्याचे दिसते. भारतीय समाजव्यवस्था ही विविध जातीजमातींनी मिळून बनलेली आहे. 'पूर्वी चार वर्ण होते. त्यातून हळूहळू निरनिराळ्या जाती उत्पन्न झाल्या. सर्व जाती ईश्वराने निर्माण केल्या असून, त्या जन्मजात आहेत. अशी एक भ्रामक समजूत हिंदूंमध्ये रूढ झाली. प्रत्येक जात स्वतःला अन्य काही जातीपेक्षा उच्च समजते व हा उच्चनीचपणा ईश्वरनिर्मित आहे, असे मानले जाते. पण या दोन्ही कल्पना चुकीच्या आहेत. जाती केवळ जन्मावर आधारित नसून व्यवसाय, आचार, उपास्य देव, देशभेद, पंथ इ. अनेक कारणांमुळे उत्पन्न झाल्या आहेत. जातींमध्ये आणखी उपजातीही अशाच कारणांनी निर्माण झाल्या. आजचा हिंदू समाज वर्णबद्ध नसून जातीबद्ध आहे. ब्राम्हण वर्ण नसून एक जात बनली आहे. अन्यवर्णही लोप पावले आहेत. त्या वर्णातल्या जाती मात्र कायम राहिल्या आहेत'.[१] एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात समाज सुधारकांनी समाजातील उच्चनीच भेद नष्ट करण्यासाठी महत् प्रयास केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायद्याच्या चौकटीत जातियता मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु पुरोगामी महाराष्ट्रात आजही समाज सुधारकांच्या कल्पनेतील यश प्राप्त झालेले नाही.

**जातीयतेला धार्मिकतेचा मुलामा :**

जातियतेची कडक बंधने आज पाळली जात नसली, समतेचा आभास निर्माण केलेला असला तरीही जातियतेची तेढ समाजात आजही रूढ असल्याचे दिसते. 'चातुर्वर्ण्य, जातीभेद आणि अस्पृश्यता ही या काळातल्या धर्मवेत्त्यांची त्रयी विद्या होती. आणि तिचा पुरस्कार करून हा हिंदू समाज जितका विभाजित होईल, तितका करण्याचा त्यांनी जणू निर्धारच केला. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अस्पृश्य आणि त्यांच्या संकरातून निर्माण झालेल्या अनंत जाती यांनी परस्परांत विवाह करु नयेत आणि एकमेकांचे व्यवसाय करु नयेत, असे दंडक त्यांनी घातले. शिवाय भिन्न घटकांनी परस्परांचे अन्न घेऊ नये, त्यांनी परस्परांना स्पर्शही करु नये, अशी बंधने धर्म म्हणून त्यांनी लावून दिली. शूद्र व अस्पृश्य हा या मानवसमूहातील बहुसंख्य वर्ग. त्यांना वेदपठणाचा तर राहोच; पण श्रवणाचा सुद्धा अधिकार त्यांनी ठेवला नाही. म्हणजेच विद्या, पूज्य ग्रंथ यांच्याही बाबतीत हा समाज विघटीतच राहिला पाहिजे, असा या धर्मशास्त्रज्ञांचा कटाक्ष होता'.[२] धर्ममार्तंडांनी धर्मग्रंथातील विचारांचा चुकीचा अर्थ लावून जातियता, अस्पृश्यता या बाबीचे समर्थन केले होते. धर्मभोळ्या जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सामाजिक अराजकता निर्माण झालेली होती. धर्माच्या आधारावर अस्पृश्यता पाळणे पाप आहे हा विचार समाजापर्यंत पोहचविण्याची गरज होती. हा विचार महाराष्ट्रातील आचार्य आनंद शंकर ध्रुव, डॉ. भगवानदास, स्वामी केवलानंद, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, नारायण शास्त्री मराठे, इंदिरा रमण शास्त्री, पी.एच. परांजपे, पं. श्रीधरशास्त्री पाठक यासारख्या धर्मशास्त्रांच्या जाणकारांनी मांडलेला दिसतो. मानव हा समाजप्रिय प्राणी असल्याने त्याच्यात सामाजिक बांधीलकी असते. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो याची त्याला जाणीव होते. त्यातूनच समाजासाठी कार्य करण्याची भावना निर्माण होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रात याच विचारधारेने प्रेरित होऊन सुधारणावाद्यांची एक शृंखलाच निर्माण झालेली दिसते. प्राचीन धर्मशास्त्रांचे सखोल अध्ययन केलेल्या सुधारणावाद्यांनी धर्ममार्तंडांवर कडाडून प्रखर शब्दात हल्ले केले. 'चातुर्वर्ण्यावर विज्ञानाचा प्रकाशझोत टाकल्यावर त्यांची अशास्त्रीयता, असमर्थनीयता स्पष्ट झाली असली, तरी अद्याप अनेकांच्या मनात त्या प्राचीन समाजव्यवस्थेसंबंधी आकर्षण आढळते. एवढेच नव्हे तर पोथी-पुराणांच्या आधारे त्या व्यवस्थेची सयुक्तिकता पटवून देण्याचा आग्रही धरला जातो. पण भारताच्या राज्यघटनेने वर्णव्यवस्था आणि जातिभेद कालबाह्य आणि अग्राह्य ठरविले आहेत. अर्थात तेवढ्यानेही उद्देश सफल होऊ शकत नाही. निरोगी समाजरचनेच्या संदर्भात शिक्षणाने, प्रत्यक्ष आचारविचाराने, अनुकूल आर्थिक परिस्थितीने आणि योग्य वयात योग्य संस्कार, केल्याने जन्मावर आधारलेली श्रेणीबद्ध चौकट नाहीशी होऊ शकते. थोडक्यात, मनावरील योग्य संस्कार, शिक्षणाचा प्रसार आणि आर्थिक उन्नती यासारख्या उपायांनीही वर्णव्यवस्थेचे अवशेष नाहीसे होऊन निरोगी समाज बांधणी शक्य होईल'.[३] महाराष्ट्रातील जातियता नष्ट करण्यासाठी आजही सुदृढ विचारांची, आचाराची गरज आहे.

**पं. श्रीधरशास्त्रींचा जातिव्यवस्थेविषयी वैचारिक दृष्टीकोन :**

संस्कृतमधील जाती या शब्दाचे जात हे मराठी रूप आहे. जत् - जन्मणे, जन्म घेणे याचे भूतकाळी रूप जात म्हणजे जन्मलेले असे होते. त्यावरून जाती या शब्दाचा अर्थ एकाच गटात जन्मलेल्यांचा समूह असा होतो. परंतु पुढे या शब्दाला तेवढाच मर्यादीत अर्थ राहीला नाही. एखादी व्यक्ती कोणत्या गटात जन्माला आली यावरुन त्या व्यक्तीला जातीचा शिक्का मारला जाऊ लागला. जन्माला येणाऱ्या बालकास जात, वर्ग, समाज, धर्म या बाबींचा थांगपत्ताही नसताना त्यास जातीचे बिरुद लावले जाते. ही जातिव्यवस्थाच मुळात चुकीच्या पद्धतीने निर्माण झालेली आहे. चुकीच्या निकषावर जातिव्यवस्था उभी असल्याचे दिसून येते.

प्राचीन काळी वैदिक धर्मानुसार समाजात कामांची चार गटात विभागणी झाली. या कामावरुन विभागणी झालेया या गटांना चार्तुवर्ण्य



Self Attested

Scanned with OKEN Scanner